चोपडा नगरपरिषद चोपडा

(नियम क्र. ६.१.१ (महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ आणि महाराष्ट्र नगर परिषद पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये)

ई-गव्हर्नन्स

बांधकाम परवाना मंजुरी (अधिकृत)

प्रति,

श्री. दिपक बसंत भगरे व श्री. सुरेश दयाराम महाजन
रा. चोपडा ता. चोपडा जि. जळगांव

चोपडा नगरपरिषद
जावक क्र. ४९८
दिनांक: 22/4/29

विषय :- बांधकाम परवाना (अधिकृत) मंजूरी देणेबाबत.
संदर्भ :- आपला दि.२६/०३/२०२१ रोजीचा अर्ज

महाशय,

आपण खालील ठिकाणी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १८९ अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ /६९ अन्वये विकास कार्य करण्यासाठी बांधकाम परवाना मिळण्यासाठी दिनांक २६/०३/२०२१ रोजी केलेल्या अर्जास अनुसरुन या खालील व पाठीमागे दिलेल्या शर्ती व अटीस पात्र राहून आणि या सोबतच्या बांधकाम नकाशावर लाल रंगाने दर्शविलेल्या सुधारण्यास पात्र राहून आपणास हे प्रारंभ प्रमाणपत्र म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार हा बांधकाम परवाना देणेत येत आहे.

बांधकाम तपशिल : निवासी व वाणिज्य वापरासाठी (२४७.५० चौ. मि.)

बांधकामाच्या जागेचे वर्णन

मौजा /वि.स.नं.	:----------	त. सा.क. / स.नं. (सर्व्हे नं.)	:----------
गट क्र./ब.क्र./भूखंड क्र./विभाग	:- ११९४	प्लॉट क्र.	:- ०६
रस्ता / प्रभाग क्र./ मोहल्ला	:- चोपडा	शहर	:- चोपडा
प्लॉटचे क्षेत्रफळ	:- २४७.५० चौ. मि.	हिस्सा क्र. / घर क्र.	:-
बांधकामाचे क्षेत्रफळ	:- ४३०.३४ चौ. मि. (GF+FF+SF+TF)		

अटी शर्ती

१. सदरील बांधकाम परवानगी ही एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील APENDIX - K अन्वये Moderate Risk(प्लॉट एरिया = १२०.२५ चौ. मि. < २४०.५० चौ. मि.< ३०० चौ. मि.) प्रकारातील असल्याने नोंदणीकृत अभियंता / वास्तुविशारद यांनी सादर केलेल्या कागदपत्र व प्रमाणपत्राला संपूर्णत: ग्राहय धरुन विना छाननी निर्गमित केलेली आहे.

२. ही परवानगी केवळ परवानगी अर्जात सादर केलेल्या उल्लेखलेल्या अर्जदाराच्या मालकी हक्काच्या जमिनीसबंधी असून व्यतीरिक्त कोणत्याही जमिनीवर बांधकाम / विकास या परवानगीवर अनुज्ञेय राहील.

३. मंजूर नकाशाप्रमाणेच बांधकाम करणे आवश्यक असून बांधकामात बदल प्रस्तावित केल्यास अर्जदाराने सुधारित परवानगी घेणे बंधनकारक राहील.

४. प्रस्तावित इमारत बांधकाम हे नकाशामध्ये प्रस्तावित केलेल्या सदनिका चटई क्षेत्राप्रमाणे (FSI) (कारपेट क्षेत्राप्रमाणे करणे) बंधनकारक राहील.

५. प्रस्तावित इमारतीचा अनुज्ञेय वापर प्रमाणेच वापर करण्यात यावा त्याव्यतिरिक्त इमारतीचा वापर करता येणार नाही.

६. बांधकामात कोणत्याही प्रकारच्या फेरफार पुर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्द समजण्यात येईल.

७. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 48 नुसार बांधकाम परवानगी एक वर्षाच्या कालावधीकरीता वैध राहील आणि त्यानंतर ती संपुष्टात येईल.

८. उक्त दिलेल्या मुदतीत बांधकाम पूर्ण करणे शक्य नसल्यास मुदत संपण्याच्या आधी नियोजन प्राधिकरणाकडून मुदतवाढ मंजूर करुन घेणे आवश्यक राहील. विहित मुदतीनंतर आल्यास पुनश्च नव्याने बांधकाम परवानगी घ्यावी लागेल.

९. मंजूर नकाशानुसार व दिलेल्या मुदतीत बांधकाम पूर्ण करण्याची जबाबदारी बांधकाम परवानगीधारक / जागामालक व आर्किटेक्ट / इंजीनिअर / सुपरवायझर यांची राहील.

१०. मंजूर नकाशानुसार बांधकाम न करणे तसेच विकास नियंत्रण नियमावलीनुसार बांधकाम न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 52 व 53 अन्वये कारवाई करण्यात येईल.

११. विषयाधीन जागेवर यापूर्वी नगरपरिषदेकडून परवानगी दिली असेल तर ती परवानगी रद्द समजणेत यावी.

१२. प्रस्तावित जागेत जर बांधकामासाठी / विकासासाठी झाडे असतील तर ती झाडे तोडण्यात येणार असतील तर त्यासाठी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ नुसार परवानगी घेणे बंधनकारक असेल.

Scanned by CamScanner

चोपडा नगरपरिषद चोपडा

(नियम क्र. 6.1.1 (महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 45 व 69 आणि महाराष्ट्र नगरपरिषद नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 189 अन्वये)

१३. भोगवटा प्रमाणपत्र घेतलेशिवाय इमारतीचे वापर करु नये. त्यासाठी जागेवर मंजूर नकाशाप्रमाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. असे प्रमाणपत्र त्याचा नकाशा वास्तुशिल्पकार व स्थापत्य अभियंता यांचे विहित नमुन्यातील दाखल्यासह , प्रतीत व इतर आवश्यक कागदपत्रासह दाखल करण्यात यावा.

१४. भविष्यात विकास शुल्क व उपकर इत्यादी बाबत लेखा परिक्षणात आक्षेप निघाल्यास त्याची पुर्तता करुन अतिरिक्त शुल्काचा भरणा करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

१५. नागरी घनकचरा अधिनियम, 2001 अनुसार घनकचरा व्यवस्थापनेची बांधकामाच्या वेळी नियोजन करणे अर्जदारावर बंधनकारक राहील. अन्यथा त्याप्रमाणे खर्च वसूल केला जाईल.

१६. नियोजीत बांधकामामुळे इतर भुखंडावर असलेल्या कोणत्याही वहिवाटीचे हक्कांना भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार व जमिन मालकाची राहील.

१७. विषयांकित जागेचे स्थान, आकार, मालकी हक्क, पोहच रस्ता, वहिवाट वापर इ. संदर्भात काही वाद उद्भवल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील सदर बाबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१८ इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची जबाबदारी सर्वस्वी आपल्या वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहील.

१९. नियोजीत जागेचे क्षेत्र हद्दवापर, मालकी हक्क, भोगवटादार, भाडेकरु इत्यादी बाबत काही वाद झाल्यास त्यास अर्जदार पुर्णत: जबाबदार राहील तसेच मालक आणि भाडेकरु यांच्यामध्ये काही वादविवाद झाल्यास किंवा निर्माण झाल्यास त्याचे निवारण करणे आवश्यक राहील. व त्याबाबतीत नगरपरिषद जबाबदार राहणार नाही.

२०. भुखंडाची पुढील कोणतीही उपविभाग पुर्व परवानगीशिवाय करता येणार नाही. त्यातील कोणत्याही एका भागाच्या सुधारित विकासासाठी स्वतंत्रपणे विचार करता येणार नाही. तसेच मंजूर अगर प्रत्यक्ष बांधकामाचे पूर्व परवानगीशिवाय कोणतेही बदल करता येणार नाही.

२१. प्रस्तावित बांधकामाचे मंजूर नकाशाप्रमाणे कार्यान्वयन बांधकाम साहित्याची गुणवत्ता व दर्जा प्रस्तावित इमारतीचे स्टील डिझाईन व त्याप्रमाणे कार्यान्वय आणि इमारतीची एकुण आयुष्यमान इ. बाबत संबंधीत जागेचे मालक, बांधकाम , पर्यवेक्षक यांची जबाबदारी राहील.

२२. इमारतीचे बांधकाम नियमानूसार करणे तसेच तसेच सदर इमारतीचा कामाचा दर्जा सुव्यवस्थित ठेवणे मालक, आर्किटेक्ट, मटेरियल सप्लायर्स इत्यादीवर बंधनकारक राहील.

२३. नियोजीत भुखंडावर अस्तित्वातील बांधकामे असल्यास ती परवानी घेऊन काढून टाकणे संपूर्ण जबाबदारी अर्जदार यांची राहील.

२४. बांधकामाचे मटेरियल रस्त्यावर टाकावयाचे झाल्यास नगरपरिषदेच्या बांधकाम खात्याची परवानगी घेणे आवश्यक राहील. व त्याकरीता नियमाप्रमाणे लागणारी रक्कम (दंड झाल्यास त्या रक्कमेसहित) भरावी लागेल.

२५ बांधकामाचे वेळी निरुपयोगी माल मटेरियल नगरपरिषद सांगेल त्या ठिकाणी स्वखर्चाने वाहतुक करुन टाकावी लागेल.

२६. विषयांकित जागा, नदी, तलाव, विद्युतवाहिनी इ. बाबींनी बाधीत होत नसल्याची खबरदारी अर्जदाराने घेण्यात यावी. सांडपाणी अथवा भुपृष्ठात पाणी वाहून नेणेसाठी जे मार्ग असतील ते अबाधीत ठेवावे लागतील.

२७. नगर विकास विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक संकीर्ण 102004 / 389 / नवि -20 दि. 01.06.2004 नूसार गंभीर पाणी टंचाईवर उपाय म्हणून उपलब्ध पाण्याच्या साठवाचा काटेकोरपणे वापर करणे, इमारतीच्या / घराच्या छतावरुन पडणा-या पाण्याचा संचय करुन त्याचा वापर करणे तसेच सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा वापर पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त करणे, तसेच झाडांना पाणी देणे, स्वच्छता इ. करणे आवश्यक आहे.

२८. शासनाचे नगरविकास विभागाकडील परिपत्रक क्रमांक टिपीबी 432001/2133/सी - 230/01/ युडी - 11 दि. 10.03.2005 अन्वये सदनह इमारतीवर रेनवॉटर हार्वेस्टींग सिस्टीम कार्यान्वीत करणे आवश्यक राहील.

२९. जोत्या पर्यंत बांधकाम झाल्यावर इकडील कार्यालयाचे जोत्या पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील. त्यानंतरच जोत्यावरील बांधकाम करावे. अन्यथा भोगवटा प्रमाणत्र मिळणार नाही.

३०. जागा मालकांनी पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीकोनातून तसेच आपल्या सभोवतालचा परिसर हरित बनविण्यासाठी घरासभोवतालीच्या मोकळया जागेत वाहतुकीस व वहिवाटीस अडथळा होणार नाही अशा प्रकारे झाडे लावावी.

३१. प्रस्तावित बांधकाम राज्य मार्गास सन्मुख असल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून बांधकाम सुरु करणेपूर्वी नाहरकत घेणे आवश्यक राहील.

३२. भविष्यात रस्ता रुंदीकरणाखालील बाधित क्षेत्रातील कोणताही मोबदला मिळणार नाही.

३३. प्रस्तावित जागेत अधिकृत मार्ग / पोहच मार्ग प्रत्यक्षात उपलब्ध करुन देणे अनुज्ञाग्रही यांचेवर बंधनकारक राहील. बाबाबत भविष्यात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहतील.

३४. विषयांकित जागेच्या लगत असलेल्या सर्व जमिनींना विषयांकित जागेमधून पोहोच रस्ता / वहिवाट उपलब्ध करुन देणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

३५. विषयांकित जागेत नियोजीत जागेत बांधकाम सभोवताली मोकळया जागेतील भरावयाची उंची सदरचे जागेचे लगतचे रस्त्याचे पातळीपेक्षा कमीत कमी सहा इंच खाली असणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

चोपडा नगरपरिषद चोपडा

(नियम क्र. 6.1.1 (महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 45 व 69 आणि महाराष्ट्र नगरपरिषद नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 189 अन्वये)

३६. नियोजीत जागेत बांधकाम परवानगी प्राप्त झालेल्या आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणतेही बांधकाम करण्यात आलेले नाही. या संबंधीचे आर्किटेक्ट / अर्जदार प्रमाणपत्र बांधकाम सुरु करण्यापूर्वी नगरपरिषदेत सादर करणे बंधनकारक असेल.

३७. नियोजीत जागेवर मोबाई टॉवर उभारणी करु नये.

३८. तसेच पर्यावरण विभाग यांचे क्र. ईएनव्ही 2010 प्र.क्र. 145 / जा. क्र. 3 दि. 31.12.2010 रोजीच्या पत्रामधील परिच्छेद क्र. 2 नुसार अटींचे पालन करणे आवश्यक आहे.

३९. अर्जदार यांनी नगरपरिषदेमध्ये जे विकास शुल्क व उपकराची रक्कम भरणा केली आहे. विकास शुल्क रक्कमेत कुठलीही तफावत आढळल्यास फरकाची रक्कम नगरपरिषद फंडात भरणे करणे बंधनकारक असेल. ती नगरपरिषदेकडून परत केली जाणार नाही.

४०. सदर बांधकाम परवानगीच्या संदर्भात भविष्यात कोणत्याही स्वरुपाचा वाद उद्भवल्यास ते मिटविण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

४१. सदर बांधकाम परवानगीबाबत न्यायालयास भविष्यात दावा दाखल झाला किंवा करे त्यास सामोर जाण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

४२. नियोजीत जागेचे क्षेत्र सदर मालकी हक्क भेगवटादार, भाडेकरु याबाबत काही वाद उद्भवल्यास त्याम अर्जदार / वास्तुविशारद पुर्णत: जबाबदार राहील.

४३. प्रस्तावित जागेत सांडपाणी अथवा भुपृष्ठात पाणी वाहून देण्यासाठी जे मार्ग असतील ते अबाधित ठेवावे लागतील.

४४. इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षितेची रचनात्मक लेखा परिक्षण करणेचे आहे व ती जबाबदारी अर्जदार व स्थापत्य विशारद यांचेवर राहील.

४५. इमारत पाडकामाचे कराव्याची काही तफावत आढळून आल्यास सदरची पाडकामी निश्चित करण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

४६. भविष्यात सदर रेखांकनातील विकास योजना रस्ता विकसित झाल्यास त्या रस्त्याखालील क्षेत्राकरीता कोणतेही चटई क्षेत्र निर्देशांक अथवा मोबदला अनुज्ञेय राहणार नाही.

४७. सोबत : बांधकाम नकाशे दोन प्रती.

येणेप्रमाणे परवाना दिला असे.

प्रत माहितीसाठी
करनिर्धारण अधिकारी
चोपडा नगरपरिषद चोपडा
विहित नमुन्यात नगरपरिषदेस अर्ज

CHOPDA MUNICIPAL COUNCIL चोपडा नगर परिषद DIST-JALGAON

मुख्याधिकारी
चोपडा नगरपरिषद चोपडा

Scanned by CamScanner